



MAKE MY DREAM FOUNDATION
A Completeness
with unlimited abilities...

# विशेष मुलांची साद

अपंगत्व हा विषय समाजाच्या दृष्टीने थोडासा कुतूहलाचा तरीही कित्येक वर्षानंतरही अजूनही उदासीनतेचा.... समज, गैरसमज यांच्या भोवऱ्यामध्ये अडकलेला... अपंगांच्या प्रश्नांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन खूप बदलत आहे, हे जरी सत्य असले तरी दैनंदिन जीवनात अपंग व्यक्तींना खूप यातायात करावी लागते. याशिवाय अपंगत्वाप्रमाणे त्यांचे प्रश्न बदलत असतात याचा प्रामुख्याने विचार होताना दिसत नाही...


प्रत्येक पालकांना आपले बाळ हे निरोगी, अव्यंग, दिसायला सुंदर, बुद्धीने हुशार हवेहवेसे वाटते. परंतु अनेक वेळा नैसर्गिक व अनैसर्गिक कारणांमुळे बाळाच्या जडणघडणी मध्ये काही अडथळे आल्यास त्या बाळामध्ये कुठलीतरी असमर्थता निर्माण होते व अशी सर्व मुले अपंग मुलांच्या श्रेणीमध्ये येतात. यामध्ये त्या निर्वाज्य बालकाचा काय बरं दोष? आहे ती परिस्थिती ते मूल स्विकारतेच, पण त्याच्या निरोगी मानसिक वाढीसाठी त्याच्या पालकांनी, नातेवाईकांनी त्याला मनापासून स्वीकारण्याची गरज असते. त्या मुलाचे मन कोवळे, तरल असते आणि त्याला गरज असते एका जाणत्या कुंभाराची. मानसिक पातळीवर अशा मुलाशी सर्वांचे वर्तन सामान्यच असले पाहिजे. त्याच्या मनावर पालक, नातेवाईक व समाजाकडून कीव, कणव व सहानुभूतीचे संस्कार झाल्यास त्या मुलाची निकोप वाढ होण्यास अडथळे निर्माण होतात.


आर्थिकदृष्ट्या मागासलेली व शारीरिक व्यंग असलेली मुले मुख्यत्वे ग्रामीण भागातून शिक्षणासाठी आलेली असतात. या मुलांची लहान वयात आवश्यक ती ऑपरेशन करण्यासाठी यांच्या पालकांकडे पैसे नसतात आणि या मुलांचे दळणवळणाचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांचे पालक असमर्थ असतात. मग असे पालक निवासी संस्थांचा मार्ग निवडतात, जिथे त्यांच्या मुलांच्या प्रगती बाबतीत कुठलाच अडथळा येणार नसतो व आपल्या मुलांची वाढ निकोप व्हावी, ही आंतरिक इच्छा. शारीरिक व्यंग व त्या संदर्भातील ऑपरेशन्स, कृत्रिम अवयव, कृत्रिम साधने या बाबतीतील संस्थांचे काम अत्यावश्यकच आहे.

अंध, मूकबधिर, कर्णबधिर मुलांना शिकवण्यासाठी विशेष पद्धत वापरावी लागते. त्यामुळे त्यांच्यासाठी विशेष शाळा सुरू झाल्या. पण खरे तर त्यांच्यासाठी विशेष शाळांपेक्षा नेहमीच्या शाळेत वेगळा वर्ग तयार करण्याची गरज होती. त्यामुळे अव्यंग मुलांना व्यंग असलेल्या मुलांशी कसे जुळवून घ्यायचे याचे ज्ञान मैदानी खेळ, स्पर्धा, शिक्षणाव्यतिरिक्तचे कार्यक्रम यामधून मिळून त्या मुलांना त्यांच्या अपंगत्वाचा विसर पडायला लावणारे निकोप वातावरण तयार झाले असते. अस्थिव्यंग गटातील मुलांना फक्त दळणवळणाचा प्रश्न असल्याने त्यांच्यासाठीही विशेष शाळांची गरज नसते.

अशा शारीरिक व्यंग असलेल्या व आर्थिक दुर्बल घटकातील मुलांचे खरे प्रश्न तर संस्थेने सोडविलेले असतातच, तरीही ही मुले अभ्यासात का बरे मागे पडत असतील? त्याचे एकमेव कारण असं आढळते की, व्यंग मुलांच्यातील क्षमतांचे योग्य मुल्यांकन करून वाढीच्या वयात बौद्धिक व भावनिक क्षमता विकसित करण्यासाठी विशेष प्रयत्न कमी पडले असावेत. आमच्या संस्थेत दाखल झालेल्या अस्थिव्यंग गटातील मुलांच्या मानसिकतेचा अभ्यास करताना असे जाणवले कि ही मुले ध्येयाने प्रेरित नाहीतच. मुळात ध्येय या शब्दाची ओळखच त्यांना नाही, मग ध्येयाबाबतीत त्यांनी स्वप्ने कशी पहावीत आणि पूर्ण करावीत? अनेक मुलांच्या मनात डोकावताना या बाबतची उदासीनता मला प्रकर्षाने जाणवते. विशेष संस्थांमध्ये शिक्षण घेतलेल्या या मुलांच्या मनात तयार झालेली वेगळेपणाची अदृश्य भिंत बरेचदा तशीच राहते. एकूणच अपंगांचे प्रश्न जस जसे समोर येत गेले तस तशी उत्तरे निघत गेली. उत्तरांची चौकट ठरलेली, अपंगांचे एक निराळे विश्व तयार करणारी.

एकूणच सर्व गटातील अपंग मुलांच्या दळणवळणाचा विचार करता सर्व शाळा, कॉलेजमध्ये रॅम्पस् व विशेष बदल केलेली शौचालये, विशेष वाहन पार्किंग व्यवस्था यांची आवश्यकता असताना, त्याबाबत अजूनही फारसे काम झालेले दिसत नाही. आजचे कटू सत्य हेच आहे की,









आम्ही सिंहगड सर केलाय!

जवळपास ७० – ८० वर्षांच्या कालावधीनंतरही पुण्यातील काही बोटावर मोजता येणाऱ्या शाळा, कॉलेजमध्ये फक्त रॅम्पस् आढळतात. खरे तर शासनाचे या बाबतीतील नियम अगदी स्पष्ट आहेत, परंतु दुर्दैवाने परिस्थिती फारच गंभीर आहे.

अशा सर्व प्रश्नांसाठी वरील गटातील विशेष मुलांना फक्त आर्थिक मदतची गरज नसून, मार्गदर्शन करणाऱ्या संस्कार केंद्रांची अर्थातच अनेक गुरुकुलांच्या निर्मितीची गरज आहे, विशेष शाळांची नव्हे.

बहुविकलांग, मतिमंदत्व, स्वमग्न गटातील मुलांचे प्रश्न बरेचदा गंभीर असतात. तिथे पालकांच्या मानसिक कणखरपणाची कसोटीच लागते. एकतर असे वेगळे मूल त्याच्या मर्यादेसह जाणीवपूर्वक स्वीकारणे महाकठीण. असे मूल म्हणजे खऱ्या अर्थाने विशेष गरजा असलेले मूल. त्यासाठी केलेले अथक प्रयत्न बऱ्याचदा अपुरे असतात. अर्थातच या गटातील व्यंग मुलांना विशेष शिक्षण पद्धतीची, विशेष प्रशिक्षित शिक्षक तसेच बौद्धिक, मानसिक क्षमतेनुसार विशेष अभ्यासक्रम यांची गरज असल्यामुळे त्यांच्यासाठी विशेष शाळांची निश्चितच गरज आहे.

अशा मुलांसाठी काम करताना मुख्य गरज आहे, त्यांच्या आजारांची आणि प्रश्नांची ओळख पालक, नातेवाईक आणि समाजाने करून घेणे. या साठी डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, ऑक्युपेशनल थेरपी, स्पीच थेरपी, संगीत उपचार, सेन्सर इंटिग्रेशन थेरपी यासाठी विशेष शिक्षक व पालक यांचे मुलांच्या विविध आजारानुसार गट (सपोर्ट ग्रुप) स्थापन करणे आवश्यक आहे. त्यामधून त्या मुलाची नैसर्गिक प्रगती, बौद्धिक व भावनिक क्षमतांचा विकास, दैनंदिन समस्या यांचा सातत्याने आढावा घेणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांची निर्मिती म्हणजेच चालण्या फिरण्यासाठी उपकरणे, संभाषण उपकरणे, दैनंदिन जीवनासाठी आवश्यक साहाय्यक उपकरणे, विशेष बदल केलेली शौचालये, कपड्यांमधील फेरबदल, लेखन साहित्यातील फेरबदल इत्यादी अनेक योग्य उपाय योजना करणे आवश्यक आहेत. अशा विशेष मुलांसाठी असे गट, विशेष उपचार केंद्रे, संस्कार केंद्रे, मनोरंजनाची केंद्रे, व्यावसायाभिमुख प्रशिक्षण केंद्रे पुण्यातील विविध भागांमध्ये तयार होणे गरजेचे आहे.

अशा गटांद्वारे अशा मुलांचे दैनंदिन प्रश्नासाठी मार्ग काढता येईल, जसे मुलांची एकत्रित वाहन व्यवस्था निर्माण करता येऊ शकते, जेणेकरून अशा मुलांच्या पालकांवरील दळणवळणाचा अतिरिक्त ताण कमी होईल. आरोग्य विषयक नियमित तपासण्या, अपंगत्वाची सर्टिफिकेटस्, सरकारी सवलतींची माहिती, सरकारी सवलतींचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव, मार्गदर्शकांची व्याख्याने यासाठीही अशी मदत केंद्रे काम करणे अपेक्षित असेल.

बहुविकलांग मुलांपैकी काही मुले नेहमीच्या शाळा–कॉलेजमध्ये शिक्षण घेऊ शकणार असतील तर त्यांना 'सर्व शिक्षा अभियान' या अंतर्गत प्रवेश मिळण्यासाठी असे ग्रुप मदत करतील. यासाठी आर्थिक स्तराची तुलना न करता, फक्त या विशेष मुलांच्या गरजा लक्षात घेऊन सर्व मुलांचे पालक, नातेवाईक आणि समाजातील अनेक मदतनीसांनी संघटित होण्याची गरज आहे. तसेच सहलींचे आयोजन करता येऊ शकते. अशा सर्व केंद्रांसाठी आवश्यक आर्थिक पाठबळ, मनुष्यबळ, मार्गदर्शक समाजातील अनेक स्तरांमधून उभे केले जाऊ शकतात.

सर्व प्रकारच्या अपंग मुलांसाठी **'स्वावलंबनातून यशाचा मार्ग'** ही यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली असली पाहिजे. त्यासाठी प्रत्येकाच्या क्षमतेनुसार काम उपलब्ध होणे गरजेचे आहे. विशेष मुलांचे प्रश्न सोडविताना सरकारी कायद्यापेक्षा संधीच्या स्वरूपातील मदतीची जास्त आवश्यकता आहे. सहानुभूतीपेक्षा माणुसकीच्या नजरेतून या प्रश्नांकडे पाहण्याची जास्त गरज आहे. **'जगा आणि जगू द्या'** या तत्वावर प्रत्येकाचा योग्य सन्मान होणे गरजेचे आहे.

आपल्या शेजारी पाजारी अशी अनेक मुले आपणांस आढळतील, त्यांना मनापासून आपलेसे करा, त्यांच्या प्रश्नांची उत्तरे जिव्हाळ्याने सोडवा.



मेक माय ड्रीम फौंडेशन तर्फे
खाजगी वितरणासाठी प्रकाशित